आतील पानात वाचा

- पंढरीच्या वारीचे माहात्म्य !
- शिव्या शाप देणारा नव्हे तर आशीर्वाद देणारा व्यवसाय करा !
- देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताहाला रक्तदान शिबिरांनी सुरुवात...



दैनिक अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध Email : newsaksharaj2021@gmail.com



SPB
SHRI PISARNATH BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२



वर्ष : ०५ | अंक : ३३५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.१६ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## वारकऱ्यांसाठी आनंदाची बातमी!

# आषाढी यात्रेसाठी धावणार ५५०० एसटी बसेस

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, पुणे :** 'आषाढी यात्रेच्या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येत असतात. या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी राज्य परिवहन म हामंडळाकडून यात्राकाळात साडेपाच हजार विशेष बस सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे,' अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

या वेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, पंढरपूरच्या नगराध्यक्षा प्रणिता भालके व एसटीचे सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.




सरनाईक म्हणाले, 'गेल्या वर्षी आषाढी यात्रेसाठी एसटीने पाच हजार १४५ विशेष बस चालवून २१ लाख ९५ हजार भाविकांची सुरक्षित ने-आण केली होती. यंदा त्याहून अधिक सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. एकादशीच्या दिवशी लाखो भाविक परतीच्या प्रवासाला निघत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटीचे ३६हून अधिक वाहतूक नियंत्रक आणि सुरक्षारक्षक नियुक्त करण्यात येणार आहेत. वारकरी भाविकांसाठी पंढरपूर व परिसरात चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत.

ग्रुप बुकिंगची सुविधा

राज्यातील कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. या विशेष बससेवेतही सरकारच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार आहेत. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेअंतर्गत मोफत प्रवास, तर महिलांना महिला सन्मान योजनेअंतर्गत तिकीटदरात ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी, असे आवाहन सरनाईक यांनी केले.

## मुंबईत धावलेल्या पहिल्या बेस्ट बसची शताब्दी

### पहिल्या मार्गावर बस प्रवास आणि केक कापून सेलिब्रेशन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, मुंबई :** स्वातंत्र्यपूर्व काळात १५ जुलै १९२६ रोजी मुंबईत पहिली बस अफगाण चर्च (कुलाबा) ते क्रॉफर्ड मार्केट (छत्रपती शिवाजी महाराज मंडई) या मार्गावर धावली होती. या बस सेवेला यंदा १०० वर्ष पूर्ण झाली आहेत. त्याचे औचित्य साधून मुंबईतील 'बस स्टन्ड' या ग्रुपने अनोखा उपक्रम बुधवारी साजरा केला. १९२६ रोजी धावलेल्या मार्गावरुन बसने प्रवास करत त्यानंतर केक कापून हा अनोखा बस दिन साजरा केला.

मुंबईत सुरू झालेल्या पहिल्या बससेवेच्या शताब्दी वर्षानिमित्त 'बस स्टॅन्ड ग्रुप'चे एडमिन शुभम पालांडे आणि इतर बसप्रेमी एकत्र आले होते. त्यांनी अफगाण चर्च (कुलाबा) ते क्रॉफर्ड मार्केट या मुंबईतील पहिल्या बसमार्गाची आठवण जपण्यासाठी व 'बस स्टन्ड' ग्रुपच्या पुढाकाराने बस बुक करून त्याच मार्गावरुन प्रवास केला. आणि जुन्या आठवणींना उजाळा दिला. शेवटी बेस्ट भवन येथील श्यामाप्रसाद मुखर्जी चौक येथे केक कापून शताब्दी साजरी केली. त्यानंतर सायंकाळनंतर याच बसने कोस्टल रोड, सिद्धीविनायक मंदिर, प्लाझा, दादर टीटी मार्गे वडाळा डेपोपर्यंत प्रवास करत या उपक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने बेस्ट प्रेमी उपस्थित होते.

## पेन्शनर्सना आता स्टॅम्प पेपर लागणार नाही

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१५, नवी मुंबई :** शासनाने राज्यातील लाखो निवृत्तीवेतनधारकांना (पेंशनर्स) एक अतिशय मोठा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. निवृत्तीवेतनासाठी बँकेत संयुक्त बचत खाते उघडल्यानंतर सादर कराव्या लागणाऱ्या शपथपत्रासाठी आता कोणत्याही प्रकारच्या मुद्रांक शुल्काची (स्टॅम्प पेपर) गरज भासणार नाही. शासनाने मुद्रांक शुल्काची (स्टॅम्प पेपर) अट पूर्णपणे रद्द केली असून, निवृत्तीवेतनधारकांना आता केवळ साध्या कागदावर शपथपत्र सादर करण्याची परवानगी दिली आहे. हा महत्त्वपूर्ण निर्णय १ ऑगस्ट २०२६ पासून संपूर्ण राज्यभरात लागू होणार आहे. यापूर्वीच्या नियमांनुसार, निवृत्तीवेतनधारकांनी बँकेत संयुक्त खाते उघडल्यास त्यांना १०० रुपयांच्या जनरल स्टॅम्प पेपरवर शपथपत्र लिहून द्यावे लागत होते. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या परिशिष्ट १ मधील अनुच्छेदामध्ये सुधारणा करण्यात आल्यामुळे हे मुद्रांक शुल्क १०० रुपयांवरून थेट ५०० रुपये इतके निश्चित करण्यात आले होते. मात्र, दुसऱ्या बाजूला शासकीय कार्यालयांमध्ये दाखल करावयाच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रांवर मुद्रांक शुल्क माफ करण्यात आलेले होते. हीच बाब लक्षात घेऊन आणि निवृत्तीवेतनधारकांना होणारा आर्थिक व मानसिक त्रास वाचवण्यासाठी शासनाने या नियमात बदल करण्याचा निर्णय घेतला.

या पार्श्वभूमीवर, शासकीय कार्यालयात दाखल करावयाच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रांवर मुद्रांक शुल्क माफ असल्यामुळे, १९ जून २०१३ रोजीचा जुना शासन निर्णय रद्द करण्यात आला आहे. नवीन निर्णयानुसार, आता निवृत्तीवेतनासाठी बँकेत संयुक्त खाते उघडणाऱ्या कोणत्याही निवृत्तीवेतन धारकाला ५०० रुपयांच्या किंवा पूर्वीच्या १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरची आवश्यकता राहणार नाही. त्याऐवजी, ते साध्या कागदावर शपथपत्र भरून अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई तसेच राज्यातील सर्व जिल्हा व तालुका कोषागार कार्यालयांमध्ये थेट सादर करू शकणार आहेत.

## आषाढी वारीत अन्न सुरक्षेचा धडाका! पंढरपुरात २१७ आस्थापनांची तपासणी; ३ हॉटेल्स तात्काळ बंद

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१५, पंढरपूर :** आषाढी वारीसाठी पंढरपूरात दाखल होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत अन्न व औषध प्रशासनाने शहरात धडक तपासणी मोहीम राबविली आहे. १४ जुलै २०२६ पर्यंत तब्बल २१७ हॉटेल्स, मिठाई दुकाने, फरसाण केंद्रे, खानावळी आणि प्रसाद विक्रेत्यांची तपासणी करण्यात आली. यावेळी १७२ अन्ननमुने प्रयोगशाळेतील विश्लेषणासाठी घेण्यात आले, तर निकृष्ट दर्जा व स्वच्छतेच्या गंभीर त्रुटी आढळल्याने ३ आस्थापनांना तात्काळ व्यवसाय बंद करण्याचे आदेश देण्यात आले.

**भाविकांच्या आरोग्यासाठी विशेष खबरदारी**

वारीदरम्यान भेसळयुक्त, निकृष्ट किंवा अस्वच्छ अन्नपदार्थांमुळे कोणताही आरोग्याचा धोका निर्माण होऊ नये, यासाठी अन्न साठवणूक, स्वच्छता, खाद्यतेल, कृत्रिम रंग व इतर घटकांची काटेकोर तपासणी करण्यात आली.

**- कारवाई झालेली आस्थापने -**

मे. मंगलमुर्ती मिसळ व भेळ,
तीन रस्ता, शेगाव दुमाला
मे. हॉटेल स्वरा अँड चायनिज सेंटर,
शेगाव दुमाला
हॉटेल श्री विष्णू सहस्त्रनाम, शेगाव दुमाला

**अहवालानंतर कठोर कारवाईचा इशारा**

सहायक आयुक्त साहेबराव देसाई यांनी सांगितले की, प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर भेसळ किंवा निकृष्ट दर्जा सिद्ध झाल्यास संबंधितांवर अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल. सर्व व्यावसायिकांनी स्वच्छता व गुणवत्तेचे नियम काटेकोरपणे पाळावेत, असे आवाहनही त्यांनी केले.




**२० विशेष पथके कार्यरत!**

आषाढी वारी २०२६ दरम्यान अन्न सुरक्षेवर लक्ष ठेवण्यासाठी २० विशेष पथके कार्यरत असून, अन्नपदार्थांच्या दर्जाबाबत तक्रार असल्यास नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ वर संपर्क साधावा, असे प्रशासनाने कळविले.

## आषाढी यात्रेसाठी ११ लाख बुंदी लाडू प्रसादाची भव्य तयारी !

### भाविकांना २४ तास उपलब्ध श्रींचा प्रसाद; मंदिर समितीची व्यापक व्यवस्था

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१५, पंढरपूर :** आषाढी यात्रेनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूरमध्ये लाखो भाविकांचा ओघ सुरू असताना श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने भाविकांसाठी तब्बल ११ लाख बुंदी लाडू प्रसाद आणि ७५ हजार राजगिरा लाडू प्रसाद उपलब्ध करून देण्याची भव्य तयारी केली आहे. मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी ही माहिती दिली.

आषाढी यात्रेदरम्यान राज्यासह देशभरातून लाखो भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरीत दाखल होत आहेत. दर्शनानंतर प्रत्येक भाविक श्रींचा प्रसाद घेऊनच परततो, ही परंपरा लक्षात घेऊन मंदिर समितीने यंदा प्रसाद निर्मिती आणि वितरणासाठी व्यापक नियोजन केले आहे.

बुंदी लाडू प्रसादाची निर्मिती मंदिर समितीच्या एमटीडीसी भक्तनिवास येथील उत्पादन केंद्रात केली जात असून, त्यासाठी हरभरा डाळ, साखर, डबल रिफाइंड शेंगदाणा तेल, काजू, बेदाणे आणि वेलची यांसारख्या दर्जेदार साहित्याचा वापर केला जात आहे. तर राजगिरा लाडू प्रसाद आऊटसोर्सिंग पद्धतीने खरेदी करण्यात येत आहे.



भाविकांना ७० ग्रॅम वजनाचे दोन बुंदी लाडू प्रति पाकीट फक्त २० रुपये, तर २५ ग्रॅम वजनाचे दोन राजगिरा लाडू प्रति पाकीट १० रुपये दराने उपलब्ध करून देण्यात आले आहेत. प्रसाद विक्रीसाठी उत्तरद्वार आणि श्री संत तुकाराम भवन येथे दोन विक्री केंद्रे सुरू असून ती २४ तास अखंडपणे भाविकांच्या सेवेत कार्यरत आहेत.

प्रसाद निर्मितीमध्ये अन्न व औषध प्रशासनाच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्यात येत असून, शासकीय प्रयोगशाळेमार्फत तपासणी करून प्रसाद खाण्यास योग्य असल्याचे प्रमाणित करण्यात आले आहे.

या संपूर्ण प्रसाद व्यवस्थेची जबाबदारी अनुभवी विभाग प्रमुख संजय कोकीळ यांच्याकडे सोपविण्यात आली असून, व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे ११० कर्मचारी व स्वयंसेवक २४ तास भाविकांच्या सेवेसाठी कार्यरत आहेत.

## महाराष्ट्रातील अमराठी ऑटो रिक्षा चालकांना मराठीचे प्रशिक्षण

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** महाराष्ट्र माझा... मराठी माझी संवाद भाषा....! महाराष्ट्रातील सर्व ऑटो चालकांना आपल्या प्रवाशांशी मराठीतून व्यवहार, संभाषण करावे, या उदात्त हेतूने महाराष्ट्र शासन परिवहन विभागाच्यावतीने संपूर्ण राज्यभर ऑटो रिक्षा चालकांना मराठी भाषा प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्रातील सर्व मराठी ऑटोचालकांना मराठीतून ग्राहकांशी संवाद करता आला पाहिजे, या उदात्त हेतूने महाराष्ट्र राज्य, मराठी विकास संस्था, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



प्रादेशिक परिवहन कार्यालय चंद्रपूर येथील ऑटो रिक्षाचालकांना मराठी भाषा प्रशिक्षण कार्यशाळेच्या कार्यक्रमात मुख्य मार्गदर्शक म्हणून मराठी विषय शिक्षक महासंघाच्या मुंबई जिल्हा प्रतिनिधी, आणि कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सन्माननीय सदस्य प्रा. दीपा ठाणेकर व ज्येष्ठ साहित्यिक, अनुवादक मुंबई मराठी साहित्य संघाच्या सदस्य डॉ.अनुराधा उजगरे प्रामुख्याने उपस्थित होत्या. या कार्यक्रमाला मराठी विषय शिक्षक महासंघाचे राज्य उपाध्यक्ष प्रा. डॉ. ज्ञानेश हटवार, राज्य मार्गदर्शक डॉ.विजय हेलवटे, चंद्रपूर जिल्हा प्रतिनिधी प्रा.नामदेव मोरे, चंद्रपूर जिल्हा मार्गदर्शक प्राचार्य डॉ. सुधीर मोते, परिवहन विभागाचे अधिकारी किरण मोरे, गडचिरोली व चंद्रपूर परिवहन अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी मराठी विषय शिक्षक महासंघाच्या मुंबई जिल्हा प्रतिनिधी प्रा. दीपा ठाणेकर व डॉ. अनुपमा उजगरे यांनी ऑटोरिक्षा चालकाशी संवाद साधला. महाराष्ट्रात आपण आपला उदरनिर्वाह ऑटोरिक्षावर करीत असल्याने आपण ग्राहकांशी मराठी भाषेतून संवाद साधावा याचे महत्त्व पटवून दिले. यावेळी प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी किरण मोरे यांनी ऑटोरिक्षा बांधवांना मार्गदर्शन केले. डॉ विजय हेलवटे यांनी तयार केलेल्या प्रतिज्ञेचे वाचन प्रा.नामदेव मोरे यांनी केले.

यावेळी महासंघाच्या वतीने प्रा. दीपा ठाणेकर तसेच डॉ. अनुपमा उजगरे यांचा शाल श्रीफळ व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील अमराठी रिक्षा चालकांना मराठीचे प्रशिक्षण देण्याकरिता ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत जवळपास २०० ऑटोचालक बंधू भगिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ सुधीर मोते यांनी केले. कार्यक्रमाची सांगता महाराष्ट्र गीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय चंद्रपूरच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

अक्षराज



# संपादकीय

## खरे संकटमोचक

पालघर जिल्ह्यातील वसई, विरारसह अनेक शहरे गेल्या आठवड्यात पाण्यात बुडाली होती. पालघरमधील केळवे रोड उपनगरातील हनुमानपाडा भागात प्रसंगावधान, समर्पण आणि कल्पकता यांचा हृद्य संगम पाहायला मिळाला. सर्वत्र गळ्यापर्यंत पाणी होते आणि त्यात एक गर्भवती प्रसूतीकळांनी व्याकुळ झाली होती. या भागातील आशासेविका, समाजसेवक, रुग्णवाहिका चालक आणि नागरिकांनी घराच्या दरवाजाचेच स्ट्रेचर करून त्यावरून या गर्भवतीला ग्रामीण रुग्णालयापर्यंत नेले व तिथे एका बाळाचा जन्म झाला

गेल्या आठवड्यात पावसाने कहर केला. कनेक्टिंग लिंकच्या दारात दरड कोसळली. वृक्ष उन्मळून पडले. अशावेळी सर्व यंत्रणांना रस्ते मोकळे करणे, अडकलेल्या जीवांना सुखरूप बाहेर काढणे यास प्राधान्य द्यावे लागते. भर पावसात जिवाची बाजी लावून दरीत उतरणारे, दगड बाजूला करणारे, वृक्षाच्या फांद्या कापू शकणारे श्रमिक विनाविलंब घटनास्थळी हजर करणे, हे मोठे जिकिरीचे काम असते. ओली झाडे, सरकणारे दगड-धोंडे हे सर्व सांभाळतच अवजड यंत्रणांचा वापर करावा लागतो. घाटामध्ये अपघात झाला की, 'यशवंती हायकर्स'सारखे तरबेज गिर्यारोहक कित्येक वर्षे मदतीला धावून येत आहेत. मृतदेह बाहेर काढण्याचे कामही त्यांनी केले आहे. काही जणांसाठी हे नैमित्तिक कामाचा भाग असते, तर काहींसाठी कर्तव्यभावना. पगारी ड्युटी करणाऱ्यालाही कर्तव्यभावना काही चुकत नाही. परवा अतोनात पाऊस पडत असताना रेनकोट घातलेल्या एक मावशी ओणवे वाकून दोन हातांतील पत्र्यांमध्ये पालापाचोळा गोळा करण्याचे काम करत होत्या. त्यांनी त्यात जराही कुचराई केली असती, तर त्या रस्त्यावर गुडघाभर पाणी तुंबायला वेळ लागला नसता. या कष्टकऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम' नाही!

संकटमोचक म्हटले की आजकाल केवळ राजकीय नेतेच लोकांना आठवतात. हे संकटमोचक आकड्यांची जुळवाजुळव करतात. खऱ्या संकटमोचकांना मात्र सामग्री, श्रम, वेळ, जोखीम आणि कल्पकता यांची मोट बांधावी लागते. प्रसंगी 'एसओपीं'च्या विरोधात जाऊन काम करावे लागते. या सगळ्यात आपली जुगाड जुळविण्याची भारतीय वृत्ती फार उपयुक्त ठरते. २६ जुलै २००५च्या पुरामध्ये मुंबई पोलिसांना त्यांचे वायरलेस नेटवर्क शाबूत ठेवणे अत्यंत आवश्यक होते. त्या वेळी पश्चिम उपनगरात एका मोक्याच्या टेकडीवर असलेल्या टॉवरला विद्युतपुरवठा करण्यासाठी वायरलेस विभागाने पोलिस वाहन विभाग व अन्य ठिकाणच्या मोटारींच्या बॅटरींचा सुयोग्य वापर केला होता. हे ज्या पोलिसांना सुचले, त्यांच्या कल्पकतेला दाद द्यायला हवी. विक्रोळीत एकदा एका मोठ्या कंपनीच्या अखत्यारीतील भुयारी मार्गात एक सामग्रीवाहक ट्रेलर उंचीमुळे अडकून पडला. कुणाला उपाय सुचेना. तेव्हा तेथील शाळकरी मुलांनी क्लृप्ती सांगितली आणि ट्रेलरच्या चाकातील हवा काढल्यावर तो बाहेर निघाला. आयआयटीमध्ये तर ग्रामीण भागात उपयुक्त तंत्रज्ञान उभे करण्यासाठी 'सीटारा' नावाची एक संस्थाच कार्यरत आहे.

सध्या कृत्रिम प्रज्ञेचा बोलबाला आहे. शोधनिबंध लिहिण्यापासून ते अर्कचित्र चितारण्यापर्यंत सर्व काही हे एआय करते; परंतु माणसाऐवजी गटारात उतरून स्वच्छता करणे, भूमिगत टाकीची सफाई, डम्पिंग ग्राऊन्डच्या आगी शमविणे अथवा दुर्गंधी थोपविणे, उघड्या मॅनहोलची वर्दी देणे अशा कोणत्या कामासाठी या एआयला कामाला लावता येईल का? आजकाल झाडे कापण्यापासून ते नारळ उतरवण्यापर्यंतच्या कामांसाठी अनेक यंत्रे – आणि तीही बॅटरीवरची पोर्टेबल यंत्रे – बाजारात येत आहेत. खेदाची बाब म्हणजे यातली बरीच यंत्रे परदेशी असतात. एआय आणि आपली कल्पकता यांचा संगम साधून असे संकटमोचक जुगाड आणता येतील का? अंगावर शिसारी आणणारी आणि जीव धोक्यात घालणारी आपत्कालीन कामे करण्यासाठी एआय मदतीला येईल, तर खरे.

**– समीर कर्वे**

# पंढरीच्या वारीचे माहात्म्य !



महाराष्ट्रातील सर्वात मोठा लोकोत्सव म्हणजे पंढरीची वारी. दरवर्षी आषाढी – कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने देशभरातून लाखो वारकरी पंढरपुरात दाखल होतात. शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास केल्यानंतर विठुरायाचे झालेले मुखदर्शन साक्षात भगवंतप्राप्ती झाल्याचे सुख त्यांना देते. आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी । संत नामदेव महाराजही आपल्या अभंगात सांगतात, जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर ! पृथ्वीवरील केवळ दोनच तीर्थक्षेत्रे नाश न पावणारी आहेत. एक म्हणजे काशी आणि दुसरे म्हणजे पंढरपूर, कारण या क्षेत्रांचा अविनाशी तत्त्व असा महिमा भगवान शंकर आणि विष्णु यांनी आपल्या अखंड वास्तव्याने कथन केला आहे.

काशीमध्ये शंकराचे आणि पंढरपूरमध्ये विष्णूचे स्थूल रूपात अस्तित्व आहे; म्हणूनच प्रत्येक हिंदू इहलोकाची यात्रा संपवण्यापूर्वी एकदा तरी काशीस अथवा पंढरपूरला जावे, अशी इच्छा बाळगून असतो. अशी थोरवी प्राप्त झालेले हे पंढरपूर तीर्थक्षेत्र आहे. पृथ्वीवरी तीर्थे असती अपार । परी पंढरीची सर । एकाही नाही ।। असा दाखला संत नामदेव महाराज देतात, तर न करी आळस । जाय पंढरीशी । अवघी सुखराशी । तेथे आहे ।।, असे संत चोखामेळा यांनी म्हटले आहे. काशीच्या पाच यात्रा, द्वारकेला तीन वेळा जाणे, या दोन्ही यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते. सर्व सुखाचे आगर आणि संत मंडळींचे माहेरघर असल्यानेच 'अवघी दुमदुमली पंढरी । भगव्या पताका खांद्यावरी । तुळशी वृंदावन डोक्यावरी । भाव भुकेल्यांची ही वारी ।,' असे म्हटले जाते. संत ज्ञानेश्वरांनी वारी या व्रताचा प्रारंभ केला. तेव्हापासून चालू असलेल्या वारीमुळे पंढरपुरातील श्री विठ्ठलाची मूर्ती जागृतावस्थेत आली आहे. वारकरी राम कृष्ण हरी । असे नामसंकीर्तन सतत करत पंढरीस जातात. कलियुगात ईश्वराची कृपा संपादन करणार्या एका व्यक्तीपेक्षा सर्व मिळून जेव्हा कृपा संपादनाचा प्रयत्न करतात, तेव्हा ती समष्टी साधना होते. वारीमध्ये व्यष्टीसह समष्टी साधनाही होते आणि सर्व जिवांच्या उद्धारासाठी विठ्ठलाला पंढरपुरात भूतलावर यावेच लागते.

या तीर्थाचा महिमाच असा आहे. येथील भक्तांच्या तळमळीमुळे विठ्ठलाला पंढरपुरात यावेच लागते. पंढरपूरच्या वारीने आपल्या जीवनात भक्तीचा अखंड झरा पाझरू लागतो. भावभक्तीचे बीज प्रत्येकाच्या अंतर्मनात रुजवणारी ही वारी पृथ्वीच्या अंतापर्यंत अशीच चालू रहाणार आहे. भक्तांच्या संकटसमयी धावून येण्यासाठी, आपल्या भक्तांची इच्छा पूर्ण करण्यासाठी विठ्ठल पंढरपुरात उभा आहे. देव भावाचा भुकेला आहे, याची प्रचीती घ्यायची असल्यास पंढरपूरला जावे. शिस्तीचे दर्शन हे पालख्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. प्रत्येक दिंडीची रचना ठरलेली आहे. प्रारंभी भगवे ध्वजधारी वारकरी, मग तुळशी-वृंदावन घेतलेल्या महिला, त्यामागे टाळकरी, नंतर विणेकरी अशीच सर्व दिंड्यांची रचना असते. टाळ वाजवणार्या वारकर्यांचा पदन्यासही लयबद्ध असतो. भले टाळकरी-वारकरी शेकडोंच्या संख्येने का असेना ! वैयक्तिक जीवनातील अभिनिवेष बाजूला ठेवून ईश्वराच्या नामस्मरणात देहभान विसरायला लावणारा आध्यात्मिक सोहळा म्हणजे पंढरपूरची वारी !

पांडुरंग हे सामान्यांचे दैवत आहे. पांडुरंगाचा रंग सावळा आहे आणि कृष्णही सावळाच आहे. काळा रंग हा अद्वैताचा आहे. वृंदावनातील गोपी कृष्णाला म्हणत, ''अरे कृष्णा, तू अमावास्येला अंगावर काळी घोंगडी घेऊन यमुनाकाठी कदंब वृक्षावर बसलास की, तू आम्हाला दिसतच नाहीस; कारण रात्र काळी, यमुना काळी, तू काळा आणि घोंगडीही काळीच ! अशा वेळी हे सर्व अद्वैत होऊन जाते.'' संत ज्ञानदेव म्हणतात, 'तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे । सगुण निर्गुण एकु गोविंदु रे ।' म्हणजेच तो सगुण आहे आणि निर्गुणही आहे. त्याचे सगुण स्वरूप हे निर्गुणच आहे. तो स्वच्छ म्हणजे निर्मळ आहे. त्याची इंद्रिये विकाररहित आणि स्वच्छ आहेत.

तो आत-बाहेर स्वच्छ आहे; म्हणून तो 'पांडुरंग' आहे. एकदा लहानपणी संत ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई खेळत असतांना मुक्ताबाई ज्ञानदेवांना म्हणाली, ''अरे दादा, तू या पांडुरंगाला निर्गुण म्हणतोस; परंतु हा तर सगुण स्वरूपात येथे कटीवर हात ठेवून उभा आहे.'' त्यावर संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''मुक्ता, मी तुला गुरुमुखातून सांगतो. अगं, हा निर्गुणी बुंद (बिंदु) सगुणी उतरला आहे.'' एकूणच हा निर्गुणच सगुण स्वरूपात इथे दिसत आहे. तो कष्टकरी, शेतकरी, सामान्यजन आणि अनाथ यांचा कैवारी आहे; म्हणून तो (उन्हात कष्ट करून रापलेला असा) काळ्या रंगाचा झाला आहे. असा हा सगुण-निर्गुण रूपी पांडुरंग आहे. पांडुरंग हा शैव आणि वैष्णव दोघांचाही देव आहे. याला शैव आणि वैष्णव दोघेही भजतात. शैव पंथीय पांडुरंगाला 'वीरभद्र' म्हणजेच 'विठ्ठल' म्हणतात, तर वैष्णव त्याला 'गोपाळकृष्ण' असे म्हणतात. तो विष्णु आणि शिव यांचा अवतार आहे; म्हणूनच तो 'हरिहर' आहे. असा हा पांडुरंग श्रीकृष्णाचाच अवतार आहे. काही जण 'विठ्ठल हा भगवंताचा नववा अवतार बुद्ध आहे', असेही म्हणतात. (आद्यशंकराचार्यांच्या काळात भारतात काही नवीन धार्मिक प्रवृत्तींचा उदय होऊन जैन, बौद्ध इत्यादी धर्मपंथ उदयास आले होते. महाराष्ट्रातही बौद्ध धर्माचा प्रभाव असल्याचे दिसून येते; कारण कोकण किनारपट्टी, घाटमाथा, मराठवाडा येथील सह्याद्री पर्वताच्या रांगांमध्ये बुद्धाच्या कलाकृती असलेल्या गुंफा दिसतात.) जैन विठ्ठलाला 'तो बाविसावा तीर्थंकर नेमीनाथ आहे', असे मानतात. नेमीनाथ आणि कृष्ण हे दोघेही गोपाळच होते. ते यदुकुलोत्पन्नच होते. नेमीनाथ हाही विठ्ठलासारखा वर्णाने सावळा होता. नेमीनाथांचे शंख हे चिन्ह विठ्ठलानेही धारण केले आहे. त्यामुळे या सर्व लक्षणांवरून 'विठ्ठल हा दिगंबर नेमीनाथ असावा', असे जैनांचे मत आहे.

**– सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

# शिव्या शाप देणारा नव्हे तर आशीर्वाद देणारा व्यवसाय करा !

अवैध दारू साठा जप्त, लाखो रुपयांचा गुटखा जप्त, कोट्यावधी रुपयांचे अमली पदार्थ जप्त, शेतामध्ये गांजा पिकवणारा गजाआड, जुगाराच्या क्लबवर धाड, मटक्याच्या अड्ड्यावर धाड, सावकाराच्या जाचाला कंटाळून आत्महत्या, अधिक पैशाचे आमिष दाखवून लाखो रुपयाला गंडा, फसवून जमीम बळकावली या आणि अशाप्रकारच्या अनेक बातम्या आपण नेहमीच वर्तमानपत्रात वाचत असतो.

दररोजच्या वर्तमानपत्रात अशा प्रकारची एक तरी बातमी आपल्याला वाचायला मिळते. विशेष म्हणजे चार वर्षांपूर्वी जेंव्हा देशभर कोरोना होता, कोरोनामुळे संपूर्ण देशात लॉक डाऊन घोषित करण्यात आले होते. संपूर्ण देश कुलूपबंद होता तेंव्हा देखील अशाप्रकारच्या बातम्या वाचायला मिळत होत्या. गुटखा, गांजा यासारख्या अमलीपदार्थांवर राज्यात बंदी आहे. राज्यातील काही जिल्ह्यात दारूवर देखील बंदी आहे मात्र बंदी असतानाही काही महाभाग या बंदीची संधी साधून गुटखा, गांजा बाजारात विकायला आणतात.

विशेष म्हणजे हे अमली पदार्थ ब्लॅकने विकली जातात म्हणजे अधिक पैसे देऊन ती विकले जातात. ज्या जिल्ह्यात दारूवर बंदी आहे तिथे देखील ब्लॅकने दारू विकली जाते. काही ठिकाणी पोलीस आणि प्रशासनाचे हात ओले करून बेधडकपणे या पदार्थांची विक्री केली जाते. जुगार मटका यासारखे अवैध धंदे देखील असेच बेधडकपणे सुरू असतात. वरिष्ठांकडून दबाव आल्यास कारवाईचा दिखावा केला जातो, काही दिवसांनी या अवैध व्यवसायांचा पुनश्च हरिओम होतो. कारण संबंधितांनी सोडलेली लाज. केवळ पैसे कमावणे या एकाच उद्देशाने हे महाभाग समाजाचे आरोग्य धोक्यात आणतात. गुटखा खाल्ल्याने दरवर्षी लाखो लोक कर्करोगासारख्या असाध्य रोगाला बळी पडतात. गुटखा खाल्ल्याने कर्करोग होतो हे माहीत असूनही गुटखा बनवणारे गुटखा बनवतात, विकणारे विकतात आणि खाणारे खातात. दारूबंदीचा फक्त फार्स केला जातो. ज्या भागात दारूबंदी आहे त्या भागात तर जास्त दराने दारू विकली जाते. ड्राय डे च्या दिवशीही दारू ब्लॅकने विकली जाते. दारूमुळे लाखो कुटुंबे उध्वस्त झाली आहेत. दारूमुळे संसाराची राखरांगोळी होते. दारू पील्यामुळे यकृताचा आजार होतो.

त्या आजारात जर घरातील कर्त्या पुरुषाचा मृत्यू झाला तर त्याची लेकरे बाळे उघड्यावर पडतात हे माहीत असूनही लोक दारू पितात कारण त्यांना ती सहज उपलब्ध होते. जुगार आणि मटका खेळून अनेकजण कर्जबाजारी झाले आहेत. ही कर्जे फेडण्यासाठी सावकाराकडे जाण्याची वेळ अनेकांवर येते. सावकाराकडून काढलेले कर्ज फेडता न आल्याने काहींनी आत्महत्या केल्या आहेत. मटका जुगारामुळे जमीन जुमला विकण्याची वेळ काहींवर आली आहे. हजारो लोकांचे आयुष्य उध्वस्त करणारे, समाजाच्या आरोग्याची नासाडी करणारे कर्करोगासारख्या असाध्य रोगाचा विळखा घालून मृत्यूसमीप नेणारे उद्योग कोणी करू नये अशी सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा असली तरी हे सारे सुरूच आहे याचे कारण हे व्यवसाय करणाऱ्या महाभागांना याचे काही देणेघेणे नाही त्यांना हवाय तो फक्त पैसा. पैशासाठी सर्वकाही ! या उक्तीप्रमाणे हे लोक काम करतात. यांना कोणाच्या संसाराचे देणेघेणे नाही की कोणाच्या आरोग्याचे.

यांचा उद्देश केवळ आणि केवळ पैसा कमावणे हाच आहे. आपला पैसा कमावण्याचा व्यवसाय हा कोणाचा तरी संसार उध्वस्त करणारा असेल तर त्या पैशातून आपल्याला समाधान मिळेल का ? याचा विचार संबंधितांनी करावा. ज्यांचा संसार उध्वस्त झालाय, व्यसनांमुळे ज्या घरातील कर्ता पुरुष देवाघरी गेलाय त्या घरातील लोक या लोकांना शिव्याशापच देत असतील. तेंव्हा असा शिव्या शाप मिळणारा व्यवसाय करण्याऐवजी लोकांचे आशीर्वाद मिळतील असा व्यवसाय संबंधितांनी करावा.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# दक्षिण भारताच्या गानकोकिळा : एस. जानकी



सिस्तला जानकी अर्थात एस. जानकी या दक्षिण भारताच्या गानकोकिळा, दिग्गज भारतीय पार्श्वगायिका होत्या. त्यांचं वयाच्या ८८ वर्षी निधन झाले त्यांनी ६० हून अधिक वर्षांच्या कारकिर्दीत २० पेक्षा जास्त भाषांमध्ये तब्बल ४८,००० हजाराहून अधिक गाणी गायली आहेत त्यांना प्रेमाने 'जानकी अम्मा' म्हणूनही ओळखले जात होते एस. जानकी यांचा जन्म आंध्र प्रदेशातील गुंटूर जिल्ह्यातील पल्लापटला येथे २३ एप्रिल १९३८ रोजी एका तेलगू कुटुंबात झाला.

लहानपणापासूनच त्यांना संगीताची आवड होती त्यांनी १९५७ मध्ये तमिळ चित्रपटसृष्टीतून पार्श्वगायिका म्हणून पदार्पण केले. त्यांनी प्रामुख्याने तमिळ, कन्नड, मल्याळम, तेलगू आणि हिंदी भाषेत हजारो लोकप्रिय गाणी गायली. त्यांनी गायलेली शास्त्रीय रचना, रोमँटिक गाणी आणि भावनिक गाणी आजही रसिकांच्या स्मरणात आहेत.

त्यांच्या अफाट योगदानासाठी त्यांना ४ वेळा 'राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार' आणि ३३ विविध राज्य पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते २०१३ मध्ये एस. जानकी यांना भारत सरकारने 'पद्मभूषण' जाहीर केला होता मात्र, आपल्या योगदानाचा सन्मान खूप उशिरा होत आहे असे सांगून त्यांनी तो पुरस्कार स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला होता त्यांनी सुर संगम, साहेब, झुठी, मर्द, धर्म अधिकारी, आखरी रास्ता, नाचे मयुरी, सत्यमेव जयते, मै तेरे लिए, अव्वल क्रमांक, हमसे हैं मुकाबला, माकसम, पाप कि दुनिया, जमाई राजा, आंधी तुफान, घायल, जान की बाजी, बादल यासारख्या चित्रपटांत गाणी गावून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले त्यांचं म्हैसूर कर्नाटक येथे निधन झाले त्यांना विनम्र आदरांजली..!


**– राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

# पळसगाव वनक्षेत्रात एका उपप्रौढ वाघाचा मृत्यू

**अक्षराज : नितेश पाटील**

**चिमूर :** ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पळसगाव वनक्षेत्रातील लोकवस्तीच्या परिसरात आज एका वाघास बेशुद्ध करून जेरबंद केले जात असताना त्याचा मृत्यू झाला. मागील महिन्यात या उपप्रौढ (Sub-adult) वाघाच्या हल्ल्यात एका नागरिकाचा मृत्यू झाला होता.

दिनांक २८/०६/२०२६ रोजी चोरगाव परिसरात श्री. शिडामे यांच्या मृत्यूस ढ २०२ऋ डर हा उपप्रौढ वाघ कारणीभूत ठरला होता. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या जलद प्रतिसाद दलाने (RRT) दिनांक ०४/०७/२०२६ रोजी त्याला बेशुद्ध करून यशस्वीरित्या पकडले होते.



त्यानंतर नियमानुसार सदर वाघास ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रात सोडण्यात आले होते. मात्र, त्यानंतर या वाघाने कोणत्याही वन्यप्राण्याची शिकार न करता पुन्हा पळसगाव वनक्षेत्रातील लोकवस्तीच्या परिसरात वावर सुरू केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे मागील तीन दिवसांपासून संबंधित वाघाच्या हालचालींवर वन विभागामार्फत सातत्याने लक्ष ठेवण्यात येत होते.

आज संबंधित वाघास आमिष बांधून पकडण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार वाघास बेशुद्ध करण्याची कार्यवाही सुरू असताना अंदाजे दुपारी ३:४५ ते ४:०० या वेळेदरम्यान त्याचा मृत्यू झाला. सदर वाघाचे शवविच्छेदन करण्यात येणार असून त्याचा सविस्तर अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येईल.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# जमिनीचा वादातून ७० वर्षीय वृद्धावर जीवघेणा हल्ला

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, बोरी (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील बोरी येथे एका ७० वर्षीय वृद्ध शेतकऱ्यावर जमिनीच्या वादातून धारदार चाकू आणि लाथाबुक्क्यांनी जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी बोरी पोलीस ठाण्यात ६ जणांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, निवळी ठोंबरे येथील रहिवासीतुळशीदास नामदेव ठोंबरे (वय ७० वर्ष) यांनी याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. तुळशीदास ठोंबरे यांचे बोरी येथे इलेक्ट्रिकलचे दुकान आहे. शुक्रवार, १० जुलै रोजी सायंकाळी साडेचार वाजेच्या सुमारास ते दुकानात असताना आरोपी त्या ठिकाणी आले. विकत घेतलेल्या जमिनीचा ताबा देण्याच्या कारणावरून आरोपींनी फिर्यादीशी वाद घालत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

अमय शंकर ठोंबरे याने हातातील चाकूने फिर्यादी तुळशीदास यांच्या डोक्यावर वार करून त्यांना गंभीर जखमी केले.काशीनाथ मोरेयाच्यावर चाकूने हातावर वार केल्याचा आरोप आहे.गजानन शंकर ठोंबरे याने पाठीमागून पकडून मारहाण केली. प्रसाद धोंडीबा कांदेव आणि ज्ञानेश्वर मारोतराव ठोंबरे यांनी दुकानातील शेगडीने फिर्यादीला मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. मनोहर वायवळ याने फिर्यादीला शिवीगाळ करत मारहाण केली.

बोरी येथील मुख्य बाजारपेठेत ही घटना अचानक घडल्यामुळे परिसरात एकच धावपळ उडाली होती. फिर्यादीचा आरडाओरडा ऐकून आजूबाजूच्या नागरिकांनी तातडीने धाव घेतल्याने त्यांची पुढील हल्ल्यातून सुटका झाली.जखमी तुळशीदास ठोंबरे यांना तातडीने बोरी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

मात्र, दुखापत गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी परभणी येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले असून, तिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास बोरी पोलीस ठाण्याचेसपोनि रामेश्वर धोंडगेयांच्या मार्गदर्शनाखालीपोलीस हेड कॉन्स्टेबल वसीम शेखहे करत आहेत.

# थोडक्यात बातम्या

## नशामुक्ती अभियानांतर्गत चित्रकला, घोषवाक्य लेखन स्पर्धेचे आयोजन




**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.१५ :** नशामुक्त भारत अभियानाच्या जनजागृती उपक्रम ंतर्गत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे गटशिक्षणाधिकारी अक्षय धुदल तसेच केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी दि.१४ जुलै २०२६ रोजी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त जीवन – निरोगी जीवन तसेच व्यसनमुक्त गाव या विषयावर उत्स्फूर्त सहभाग नोंदवत अत्यंत सुंदर, आकर्षक आणि संदेशपर चित्रे साकारली. विद्यार्थ्यांनी चित्रांमधून तंबाखू, गुटखा, मद्य व इतर व्यसनांचे दुष्परिणाम, निरोगी जीवनशैलीचे महत्त्व आणि व्यसनमुक्त समाजाची संकल्पना प्रभावीपणे मांडण्यात आली. त्यांच्या कल्पकतेने आणि सामाजिक जाणीवेने स्पर्धेला विशेष उंची मिळाली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यसनांविषयी जागरूकता निर्माण झाली आणि समाजात सकारात्मक संदेश पोहोचविण्यास हातभार लागला. तसेच दि.१५ जुलै २०२६ रोजी विद्यार्थ्यांसाठी घोषवाक्य लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या घोषवाक्य स्पर्धेतून विद्यार्थ्यांनी नशामुक्ती संदर्भात वेगवेगळ्या घोषणाचे लेखन केले. यावेळी सोयगाव गटशिक्षणाधिकारी अक्षय धुदले तसेच सोयगाव केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांनी शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांचा उत्साह व्दिगुणीत करून विद्यार्थ्यांना नक्षामुक्ती विषयावर सखोल मार्गदर्शन करून नशामुक्तीची शपथ दिली. नशामुक्ती जनजागृती साठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, कला निर्देशक विवेक महाजन, सहशिक्षिका सुरेखा चौधरी, मंगला बोरसे, रामचंद्र महाकाळ, सविता पाटील, प्रतिभा कोळी, अनिल देसाई, पुनम लाड, शुभम देसले यांनी परिश्रम घेतले.

# धनोजे कुणबी समाज पुरस्कृत चंद्रपूर जिल्हा नागरी व ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्या. उद्घाटन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** धनोजे कुणबी समाज पुरस्कृत चंद्रपूर जिल्हा नागरी व ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्यादित, चंद्रपूर चा उद्घाटन सोहळ्याचा कार्यक्रम धनोजे कुणबी समाज भवन, लक्ष्मीनगर, वडगाव, चंद्रपूर येथे नुकतेच नागपूर विभागाचे शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी धनोजे कुणबी समाज मंडळाचे अध्यक्ष श्रीधरराव मालेकर होते तर या सोहळ्यास विशेष अतिथी म्हणून राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार देवराव भोंगळे, वणी विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय देरकर, धनोजे कुणबी समाज, मध्यवर्ती समिती अध्यक्ष संजय ढवस, सी.डी.सी.सी. बँकेचे माजी अध्यक्ष मनोहर पाऊनकर, पतसंस्थेचे मुख्य प्रवर्तक सरदार पावडे, उद्योजक चंद्रकांत वासाडे, प्रा. प्रभाताई वासाडे, उद्योजक संतोष कुचनकर, आदींची मंचावर उपस्थिती होती.

उद्घाटन प्रसंगी बोलताना आ. सुधाकर अडबाले म्हणाले की, ही सहकारी पतसंस्था समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी, स्वावलंबनासाठी, आणि सर्वांगीण विकासासाठी महत्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. आ. संजय देरकर यांनी याप्रसंगी मार्गदर्शन केले व पतसंस्थेच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच आ. देवराव भोंगळे यांनीही आपले मत व्यक्त करताना सांगितले की, आपल्या समाजाला आर्थिक क्षेत्रात काम करता यावे, समाजाची आर्थिक प्रगती व्हावी, या उद्देशाने या पतसंस्थेची निर्मिती केली आहे.

पतसंस्था तयार करणे हे सोपे असते परंतू ती चालविणे फार कठिण काम असते. पतसंस्थेविषयी विस्तृत मार्गदर्शन आ. देवराव भोंगळे यांनी याप्रसंगी केले. प्रास्ताविक मुख्य प्रवर्तक सरदार पावडे यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी संस्था निर्मिती पासून तर आजपर्यंतची कार्यवाही, पतसंस्थेचे नियम, सदस्य संख्या १८२० इतकी झाली असल्याचेही सांगितले.



उद्घाटन कार्यक्रमानंतर लगेच पतसंस्थेच्या आमसभेला सुरुवात करण्यात आली. या आमसभेच्या अध्यक्षस्थान धनोजे कुणबी समाज मंडळाचे अध्यक्ष श्रीधरराव मालेकर यांनी भूषविले. तर यावेळी मुख्य प्रवर्तक सरदार पावडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रम पत्रिकेतील विषयानुसार चर्चा करण्यात येऊन ठराव घेण्यात आले.

यामध्ये सर्वानुमते कार्यकारिणीची बिनविरोध कार्यकारणीची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी सरदार पावडे, उपाध्यक्षपदी मोरेश्वर बोंडे तर संचालकपदी संजय ढवस, देवराव सोनपितरे, विजय भोगेकर, निळकंठ पावडे, डॉ. शिवम सातपुते, रंजित डवरे, पुरुषोत्तम मत्ते, नामदेव महाकुलकर, मयूर पाऊणकर, प्रकाश कुमरे, मनिषा बोबडे यांची निवड करण्यात आली.

या कार्यक्रमास मोरेश्वर बोंडे, नगरसेविका मनिषा बोबडे, नगरसेवक अजय बल्की, संजय वैद्य, रणजीत डवरे, रविंद्र झाडे, डॉ.विजय हेलवटे, अतुल देऊळकर, विजय टोंगे, ॲड. विलास माथनकर, प्रा.नामदेव मोरे, निळकंठ पावडे, डॉ.अनिल डहाके, ॲड.देवा पाचभाई, डॉ.विनोद मुसळे, देवराव सोनपितरे, प्रा.शिवम सातपुते, सुधाकर काकडे, मयूर पाऊणकर, दिपक जेऊरकर, वसंत वडस्कर तसेच समाजातील अनेक मान्यवर आणि मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन विजय भोगेकर यांनी केले.

## कामोठे परिसरातील चिकन - मटण दुकानांवर महापालिकेची धडक कारवाई



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१५, पनवेल :** महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या सुचनेनुसार प्रभाग समिती (क) अंतर्गत कामोठे परिसरात अनधिकृत अतिक्रमण व अनधिकृत चिकन व मटण दुकानांवर धडक कारवाई करण्यात आली. सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ.रुपाली माने यांच्या उपस्थितीत व प्रभाग समिती (क) चे प्रभाग अधीक्षक दशरथ भंडारी यांच्या देखरेखीखाली कामोठे परिसरातील अनधिकृत चिकन व मटण दुकानांवर कारवाई करण्यात आली. कामोठे मेन रोड ते मानसरोवर रेल्वे स्थानक या मार्गावरील फुटपाथवरील अनधिकृत व्यवसाय व अतिक्रमणांवर प्रभाग अधिकारी दशरथ भंडारी यांच्या उपस्थितीत जेसीबीच्या साहाय्याने तोडक कारवाई करण्यात आली. कारवाई दरम्यान फुटपाथवरील अनधिकृत अतिक्रमणे हटवून पादचाऱ्यांसाठी मार्ग मोकळा करण्यात आला. सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता तसेच रस्ते व पदपथ अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी ही कारवाई करण्यात आली असून, नागरिकांना सुरक्षित व सुलभ पादचारी मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी भविष्यातही अशा प्रकारच्या कारवाया सातत्याने सुरू राहणार असल्याचे पनवेल महानगरपालिकेच्या वतीने सांगण्यात आले.

# बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये ‘कोयनातीर’ वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१५, पाटण (सातारा) :** कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण संचलित बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण येथे महाविद्यालयाच्या 'कोयनातीर' या वार्षिक नियतकालिकाचा प्रकाशन समारंभ मोठ्या उत्साहात व शैक्षणिक वातावरणात संपन्न झाला. महाविद्यालयातील डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम सभागृहात आयोजित या कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व साहित्यप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या स्वागताने झाली. त्यानंतर नियतकालिकाचे प्रमुख संपादक डॉ.संजय सपुनेकर यांनी संपादकीय प्रास्ताविकातून 'कोयनातीर'च्या निर्मितीमागील उद्दिष्टे, विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला चालना देण्याची भूमिका तसेच महाविद्यालयातील विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि संशोधनपर उपक्रमांचे दस्तऐवजीकरण या नियतकालिकाद्वारे करण्यात आल्याची माहिती दिली. विद्यार्थ्यांमधील लेखनकौशल्य, चिंतनशीलता आणि साहित्यिक अभिरुची विकसित करण्यासाठी हे नियतकालिक महत्त्वाचे व्यासपीठ ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटणचे संचालक संजीव चव्हाण यांच्या शुभहस्ते 'कोयनातीर' नियतकालिकाचे औपचारिक प्रकाशन करण्यात आले. प्रकाशनानंतर नियतकालिकाच्या निर्मितीसाठी योगदान देणाऱ्या संपादक मंडळाचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रमुख संपादक डॉ.संजय सपुनेकर, सहसंपादक प्रा.श्रीगणेश गायकवाड तसेच विविध विभागांचे प्रतिनिधी असलेल्या संपादक मंडळातील सदस्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांनी वाचनसंस्कृती जोपासून लेखन, संशोधन आणि सर्जनशील अभिव्यक्तीला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. महाविद्यालयीन नियतकालिके ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची प्रभावी साधने असून त्यातून समाजाभिमुख विचारांना चालना मिळते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रामचंद्र सपकाळ यांनी 'कोयनातीर' हे नियतकालिक महाविद्यालयाच्या वैचारिक आणि सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच लेखन, संशोधन, साहित्य, कला आणि सामाजिक जाणीव यांचा समतोल विकास साधावा, यासाठी महाविद्यालय सातत्याने विविध उपक्रम राबवत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी संपादक मंडळाचे आणि नियतकालिकाच्या निर्मितीत योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांना या व्यासपीठाचा अधिकाधिक लाभ घेण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस.एस.पवार यांनी प्रभावीपणे केले, तर प्रा. अनिल पाटील ग्रंथपाल यांनी उपस्थित मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी आणि सर्व उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेला हा प्रकाशन सोहळा विद्यार्थ्यांच्या साहित्यिक अभिव्यक्तीला प्रेरणा देणारा ठरला असून उपस्थितांनी 'कोयनातीर' नियतकालिकाच्या दर्जेदार निर्मितीचे कौतुक केले.

## पदभार स्वीकारताच API सागर कोते ‘ॲक्शन मोड’वर

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१५, लासलगाव (नाशिक) :** लासलगाव पोलीस ठाण्यात नुकतेच सहायक पोलीस निरीक्षक म्हणून पदभार स्वीकारलेल्या सागर कोते यांनी रुजू होताच गुन्हेगारांविरोधात धडाकेबाज कारवायांचे सत्र सुरू केले आहे. अवघ्या दोन दिवसांत पोलिसांनी दोन मोठ्या कारवाया केल्या असून, यामुळे परिसरात 'कोते पॅटर्न'ची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. या कारवायांमध्ये पोलिसांनी एका बाजूला धारदार चाकू घेऊन बाजारतळ परिसरात दहशत माजवणाऱ्या गुंडाला जेरबंद केले, तर दुसऱ्या बाजूला आठवडा बाजारातून मोबाईल चोरणाऱ्या एका अंतरराज्यीय चोराला रंगेहात अटक केली.

**पहिली कारवाई :** चाकूने दहशत माजवणारा 'बॉक्सरभाई' गजाआड

दिनांक १३ जुलै रोजी लासलगावच्या बाजारतळ परिसरात रिजवान उर्फ 'बॉक्सरभाई' आयुब बागवान (रा. पिंजार गल्ली, लासलगाव) याने मद्यधुंद अवस्थेत एका नागरिकाला मारहाण केली. इतकेच नव्हे तर त्याने सुमारे १० इंच लांबीचा धारदार चाकू हातात घेऊन परिसरात मोठी दहशत निर्माण केली होती.

**पोलिसांची तत्परता :** घटनेची माहिती मिळताच लासलगाव पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले.

**गुन्हा दाखल :** आरोपीविरुद्ध ‘भारतीय न्याय संहिता’ तसेच 'भारतीय हत्यार कायद्या'न्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**दुसरी कारवाई :** मध्य प्रदेशातील अंतरराज्यीय मोबाईल चोर रंगेहात पकडला

यापूर्वी दिनांक १२ जुलै रोजी लासलगावच्या आठवडा बाजारातील गर्दीचा फायदा घेऊन नागरिकांचे मोबाईल चोरणाऱ्या आंतरराज्यीय चोराला पोलिसांनी बेड्या ठोकल्या. सुरज सलिम सोलंकी (रा. आहिरखेड, जि. इंदूर, मध्य प्रदेश) असे या आरोपीचे नाव आहे.

**मुद्देमाल जप्त :** पोलिसांनी त्याला रंगेहात पकडून त्याच्याकडून चोरीचा महागडा ‘सॅमसंग एस २५ अल्ट्रा’ मोबाईल जप्त केला आहे. आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याची न्यायालयीन कोठडी मिळवण्यात आली आहे.

# तलासरीतील आदिवासी प्रगती मंडळाच्या कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता ११ वी प्रवेशोत्सव उत्साहात; नवविद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१५, तलासरी (पालघर) :** आदिवासी प्रगती मंडळ संचालित कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, तलासरी येथे बुधवार, दि.१५ जुलै रोजी इयत्ता ११ वीच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयीन कुटुंबात स्वागत करणे, महाविद्यालयातील शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांची माहिती देणे तसेच विद्यार्थ्यांमध्ये महाविद्यालयाविषयी आत्मीयता व विश्वास निर्माण करणे हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमास संस्थेचे संचालक विजय खुलात, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य तथा संस्थेचे संचालक डॉ.बी.ए.राजपूत, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य तथा संस्थेचे संचालक संदीप वावरे, कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे आधारस्तंभ कॉ.ल.शि.कोम व कॉ.गोदावरी शामराव परुळेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रातिनिधिक स्वरूपात गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.




प्रास्ताविकात प्राचार्य संदीप वावरे यांनी महाविद्यालयातील गुणवत्तापूर्ण शिक्षण, नियमित उपस्थिती, शिस्त, विविध सहशालेय उपक्रम, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध सुविधांची सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनातील प्रत्येक संधीचा लाभ घेत स्वतःचा सर्वांगीण विकास साधावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी डॉ.बी.ए. राजपूत यांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास, वेळेचे नियोजन, शिस्त आणि करिअर नियोजनाचे महत्त्व पटवून दिले. उत्तम शिक्षणासोबतच निरोगी आरोग्य हे यशस्वी जीवनाचे महत्त्वाचे सूत्र असल्याचे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यानंतर कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेनुसार विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्गात नेण्यात आले. वर्गशिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वागत करून सर्व विषय शिक्षकांची ओळख करून दिली. तसेच अभ्यासक्रमाची रचना, परीक्षा पद्धती, शिस्तीचे नियम, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम, ग्रंथालय, प्रयोगशाळा आणि इतर शैक्षणिक सुविधांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहकार्यामुळे इयत्ता ११ वी प्रवेशोत्सव कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला. महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या नवविद्यार्थ्यांमध्ये या कार्यक्रमामुळे आत्मविश्वास निर्माण होऊन त्यांच्या शैक्षणिक प्रवासाची सकारात्मक सुरुवात झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.